**मा. राज्यपालांचे परिवार प्रबंधक कार्यालय, मुंबई**
**कार्यालयातील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप)**
**सहाय्यक लेखा अधिकारी हे पद भरणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे**
**कस्तुरी इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर**
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

क्र. संलेको-०४-२०२६/प्रशा-राप-सलेअ/वले-१/न.क्र.१६७/लोकभवन/ ३२८
दिनांक : 29 APR 2026

---

## परिपत्रक

माननीय राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक कार्यालय, लोकभवन, वाळकेश्वर रोड, मलबार हिल, मुंबई येथील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सहाय्यक लेखा अधिकारी हे पद भरावयाचे आहे.

सदर कार्यालयातील प्रचलित कार्यपद्धतीनुसार खालील अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या लेखा अधिकाऱ्यांची नामिकासूची (पॅनेल) उपलब्ध करून देणेबाबत मा. राज्यपालांचे परिवार प्रबंधक यांनी संचालनालयास कळविले आहे.

१. मागील पाच वर्षांचे गोपनीय अहवाल किमान उत्कृष्ट दर्जाचे असावेत.
२. सेवार्थ प्रणाली, बिल पोर्टल, वेतनिका बिडीएस (अर्थसंकल्पीय प्रणाली) व इतर संगणक हाताळणीचे उत्तम प्रकारे ज्ञान असणे आवश्यक आहे.
३. तसेच आस्थापनाविषयक व लेखाविषयक कामकाजाचा पुरेसा अनुभव असणेही आवश्यक आहे.
४. कार्यरत पदावर किमान १ वर्ष सेवा झालेले तसेच सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.१४.०७.२०२१ नुसार कोंकण -२ महसूल विभाग संवर्ग लागू असलेले अधिकारीच माननीय राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक कार्यालयातील सहाय्यक लेखा अधिकारी पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र राहतील.

तरी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर नमूद अर्हता पूर्ण करीत असलेल्या इच्छुक सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज दि.०८.०५.२०२६ पर्यंत संचालनालयास सादर करावेत. प्राप्त नामिकासुचीच्या आधारे सहाय्यक लेखा अधिकारी यांची मुलाखत माननीय राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक कार्यालयाकडून घेण्यात येईल.

**(रश्मी नांदिवडेकर)**
**सहसंचालक (प्रशासन)**
**लेखा व कोषागारे, मुंबई**

**प्रति,**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील सर्व अधिकारी.



d:\ashwin_desktop\2026\da_letter_2026.doc